सकाळ
कोल्हापूर, शनिवार, १ नोव्हेंबर २०२५

# पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेला प्रारंभ

## महाविद्यालयीन तरुणाईच्या सळसळत्या उत्साहात नाट्यजल्लोष

कोल्हापूर, ता. ३१ : महाविद्यालयीन तरुण कलाकारांच्या अभिनय कौशल्याला वाव देणाऱ्या पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेला आजपासून सळसळत्या उत्साहात प्रारंभ झाला. महाराष्ट्रीय कलोपासक (पुणे), गायन समाज देवल क्लब आणि शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र विभागाने ही स्पर्धा आयोजित केली आहे. देवल क्लबच्या गोविंदराव टेंबे रंगमंदिरात यानिमित्ताने तरुणाईचा नाट्यजल्लोष अनुभवायला मिळतो आहे.



**कोल्हापूर** : पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेत शुक्रवारी विवेकानंद महाविद्यालयाने 'लेबल' ही एकांकिका सादर केली.

स्पर्धेत रविवार (ता. २) पर्यंत २६ महाविद्यालयांचे संघ या एकांकिका सादर करणार आहेत. आज सकाळी नऊ वाजता स्पर्धेचे उद्‌घाटन महाराष्ट्रीय कलोपासक संस्थेचे सचिव राजन ठाकूरदेसाई, शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई, स्पर्धा समन्वयक मनीष आपटे, परीक्षक अनिरुद्ध दिंडोरकर, गोपाळ जोशी आणि ज्ञानेश मुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.



सकाळच्या सत्रामध्ये व्यंकटेश महाविद्यालयाने 'मागे वळून बघू नकोस', विवेकानंद कॉलेजने 'लेबल' या एकांकिका सादर केल्या. सायंकाळच्या सत्रामध्ये डॉ. डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेज, कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज (सातारा), आर्टस्‌ आणि कॉमर्स महाविद्यालय (नागठाणे), गोविंदराव सक्सेरिया विज्ञान महाविद्यालय (बेळगाव), डॉ. डी. वाय. पाटील पॉलिटेक्निक आणि राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालय (ईश्वरपूर) या महाविद्यालयांच्या एकांकिकांना प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. उद्या (शनिवारी) स्पर्धेत ११ एकांकिका, तर रविवारी (ता. २) चार एकांकिका सादर होतील. सायंकाळी सहा वाजता पारितोषिक वितरण होणार आहे.